# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## शैक्षणिक प्रवेश विभाग

### विद्यापीठ शैक्षणिक विभागातील विद्यार्थ्यांसाठी महत्वाची सूचना

### एस.सी./एन.टी./एस.बी.सी./ओ.बी.सी. स्कॉलरशीप व फ्रिशिप नवीन व नुतनीकरण असणाऱ्या सर्व प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी महत्वाचे

मा. विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांच्या आदेशानुसार एस.सी./एन.टी./एस.बी.सी./ ओ.बी.सी. या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना Online पध्दतीने सन २०१४–१५ स्कॉलरशीप व फ्रिशिप अर्ज भरावयाचे आहेत. अर्ज फक्त Online पध्दतीनेच स्विकारले जाणार असून अर्ज भरण्याची अंतिम तारीख **दि. ३१/१२/२०१४** आहे.

शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्यांनी खालील वेबसाईटवरून प्रथम User ID तयार करून Login करून अर्ज भरावेत.

http://mahaeschol.maharashtra.gov.in/Escholarshipstudent

शासनाकडून शिष्यवृत्तीकरीता अभ्यासक्रम मान्यतेची प्रक्रिया सुरू आहे. त्यामुळे जे अभ्यासक्रम अद्याप शिष्यवृत्ती अर्ज भरण्यासाठी शासनाच्या वेबसाईट उपलब्ध होत नाही, अशा विभागातील विद्यार्थ्यांनी वेबसाईट उपलब्ध झाल्यावर त्वरीत Online शिष्यवृत्तीचे अर्ज भरण्याची कार्यवाही करावी.

वेबसाईटवरील अर्ज पुर्ण भरून त्याची एक प्रिंट काढून आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह संबंधित विभागात अर्ज जमा करावेत. विभागाने प्रत्येक प्रवर्गातील विद्यार्थ्यांची माहिती शिष्यवृत्ती/ फ्रिशिप याप्रमाणे वेगवेगळी करून Excel Format मध्ये भरून सीडी व हार्ड कॉपीसह पदव्युत्तर प्रवेश विभागाकडे दि. १०/०१/२०१५ पर्यंत पाठवावी. Online पध्दतीने प्रत्यक्ष अर्ज भरताना खालील कागदपत्रे आवश्यक आहेत.

१. इयत्ता १० वी पासूनच्या सर्व गुणपत्रिका (पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या सर्व विद्यार्थ्यांनी इयत्ता १० वी मधील परीक्षा क्रमांक व आसन क्रमांक टाकणे बंधनकारक आहे)
२. स्वतःचे वैयक्तिक राष्ट्रीयकृत बँकेतील विद्यार्थ्यांचा खाते क्रमांक, बँकेचा एमआयसीआर आणि आयएफएस कोड नंबर तसेच खाते पुस्तकाची झेरॉक्स प्रत जोडावी.
३. जातीचा दाखला
४. शाळा सोडल्याचा दाखला
५. तहसिलदाराचा उत्पन्नाचा दाखला किंवा फॉर्म १६ ची झेरॉक्स प्रत
६. आधार कार्ड झेरॉक्स प्रत
७. विभागात प्रवेश घेतलेल्या प्रवेश पत्राची झेरॉक्सप्रत

जे विद्यार्थी वेळेत Online पध्दतीने अर्ज भरणार नाहीत त्यांना स्कॉलरशीप व फ्रिशिप शासनाकडून मिळणार नाही. त्यामुळे होणाऱ्या आर्थिक नुकसानीस विद्यापीठ जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

सहा. कुलसचिव
शैक्षणिक प्रवेश विभाग

गणेशखिंड, पुणे – ७
संदर्भ : पीजीएस/५५०५
दिनांक : १५/१२/२०१४

प्रत : मा. विभागप्रमुख,

आपल्या विभागातील शिष्यवृत्तीसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांना विहित मुदतीत ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याबाबतच्या सुचना देण्यात याव्यात तसेच अर्जाच्या प्रती आवश्यक त्या कागदपत्रासह विहित मुदतीत या विभागाकडे सादर करण्यात यावे ही विनंती.

Joshi/My computer/D/ Prakash natikar